
# योजना विषयी माहिती


## आरोग्य विभाग

## जिल्हा परिषद उस्मानाबाद




Powered by WhizMap® Developed by Riddhi

# आरोग्य विभागाची रचना



# शासकीय योजनांची संक्षिप्त माहिती :-

## ➢ कुटुंब कल्याण कार्यक्रम :-

उस्मानाबाद जिल्हयामध्ये ४३ प्राथमिक आरोग्य केंद्रापैकी ३७ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये शस्त्रक्रिया गृह कार्यान्वित असून त्यठिकाणी दर आठवड्यास कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया कॅम्प घेऊन शस्त्रक्रिया केल्या जातात.

शास्त्राकीरीया मोफत केल्या जातात यात शस्त्रक्रिया घेणाऱ्या मातेस रु. २५० (खुला) व रु. ६०० (एस्सी] एसटी व दारिद्र्य रेषेखालील) मानधन दिले जाते.

## ➢ जननी सुरक्षा योजना :-

जननी सुरक्षा योजनेचा लाभ शासकीय आरोग्य संस्थेत अथवा जननी सुरक्षा योजनेकरिता मानाकीत करण्यात आलेल्या खासगी आरोग्य संस्थेत प्रसूती झाल्यास सामनधित लाभार्थ्यास रु. ७००/- व या योजनेचा लाभ देण्यात येतो.

## ➢ जननी - शिशु सुरक्षा कार्यक्रम :-

ग्रामीण जनतेस वेळेत आरोग्य सेवेचा लाभ मिळण्याकरिता सदरची योजना रेफरल ट्रान्स्पोट हि योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा मुख्य उद्देश गरोदर मत बाळंतणाला येताना, तिला घरातून व गंभीर आजारी बाळ यांना घरापासून रूग्णालयातरुग्णवाहिकेने घेऊन जाण्याची सोय तसेच प्रसूती नंतर मातेला व बाळाला रुग्णालयातून घरपोच पोचविण्यात येते. या योजनेअंतर्गत हि सेवा दिवस रात्र राबविण्यात येत आहे.

प्रसूतीसाठी गरोदर मातेस घरापासून आरोग्य संस्थेत दाखल करण्यासाठी मोफत वाहन व्यवस्था करण्यात येत आहे- एका आरोग्य संस्थेतून पुढील संदर्भ सेवा देण्यासाठी दुसऱ्या आरोग्य संस्थेत पोहोचविण्यासाठी मोफत वाहन व्यवस्था करण्यात येत आहे. १ वर्षापर्यंतच्या बालकास घरापासून दवाखान्यात मोफत वाहन व्यवस्था करण्यात येत आहे. आरोग्य संस्थेतून घरी पोचविण्यासाठी मोफत वाहन व्यवस्था पुरविण्यात येत आहे.

## ➢ बालांकासाठीच्या आरोग्य सुविधा :-

अ) लसीकरण सेवा

१. संपूर्ण लसीकरण

२. वेळेत लसीकरण

३. पल्स पोलिओ अंतर्गत सर्व बालकांचे लसीकरण

ब) आजारी बालाकांकरिता

१. क्षार संजीवनीची उपलब्धता व हगवनीवर वेळेत उपचार.

२. जननी शिशु सुरक्षा योजनेंअतर्गत मोफत संदर्भ व उपचार सेवा.

क) कुपोषण

१. अति-तीव्र कुपोषित (सम)बालकावरव उपचार

## ➢ माता -आरोग्याच्या सर्वकष: सेवा (*Maternal Health* )

अ) प्रसुतीपूर्व सेवा

१. सर्व स्थलांतरित गरोदर मातांची नोंदणी

२. कमित कमी तीन वेळा परसूतीपूर्व तपासणी

३. हिमोग्लोबिन तपासणी व लोहयुक्त गोळ्या वाटप.

४. धनुर्वात प्रतिबंधात्मक लसीकरण

५. एच. आय. व्ही. तपासणी.

६. रक्त गट तपासणी

७. जोखमीच्या माता ओळखणे व उपचार करणे.

८. संदर्भसेवा

९. आरोग्य शिक्षण व समुपदेशन.

ब) प्रसूती अंतर्गत (प्रसवांतर्गत सेवा)

१. १०० टक्के संस्थात्मक प्रसूती (एकही प्रसूती खोपीत अथवा फडात होऊ नये )

२. जननी शिशु सुरक्षा योजनेअंतर्गत १०२ व १०८ टोल फ्री क्रमकांमार्फत ने-आन व संदर्भित करण्याकरिता मोफत रुग्णवाहिका सेवा व उपचार उपलब्ध करून देणे.

क) प्रसूती नंतर सेवा

१. कमीत कमी तीन भेटी. भेटी.

## ➢ आर. के. एस. (रुग्ण कल्याण समिती )

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत रुग्ण कल्याण समिती करिता,प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी वार्षिक १ लक्ष निधी दिला जातो. सदर निधी रुग्ण कल्याण समितीच्य अधीन राहून खर्च करण्यात येतो

१. रुग्णांसाठी शुद्ध व थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे.
२. रुग्णांसाठी बैठक व्यवस्था करणे.
३. प्रसूती झालेल्या मातांना साडी,चोळी व्यवस्था करणे.
४. गरजू व गरीब रुग्णांना संदर्भ सेवा देणे.
५. रुग्णांना आरोग्य संस्थेंत उपलब्ध नसलेल्या औषधे व तपासण्या उपलब्ध करणे.
६. गरोदर मातांना मोफत आहार देणे.

वरील बाबी व त्यापेक्षा अधिक सुविधा या रुग्ण कल्याण समितीमार्फत रुग्णांना पुरविण्यात येत आहेत.

## ➢ वार्षिक देखभाल निधी :-

१. प्राथमिक आरोग्य केंद्र :- प्रति वर्षे प्रति संस्था ५० हजार मंजूर निधी .
२. आयुर्वेदिक दवाखाने प्रति वर्षे प्रति संस्था १५ हजार रु. मंजूर निधी .
३. उपकेंद्र :- प्रति वर्षे प्रति संस्था १०,०००/- मंजूर निधी.
   १. आरोग्य संस्थेची किरकोळ इमारत दुरुस्ती.
   २. आरोग्य संस्थेत आदीची दुरुस्ती
   ३. कार्यलयीन उपकरणे आदीची दुरुस्ती.
   ४. संस्थेच्या परिसरातील स्वच्छता ठेवणे.
   ५. संस्थेच्या ड्रेनेजची दुरुस्ती करणे.

## ➢ अबाधित निधी :-

१. प्राथमिक आरोग्य केंद्र :- प्रति वर्षे प्रति संस्था २५ हजार मंजूर निधी.
२. उपकेंद्र :- प्रति वर्षे प्रति संस्था १०,०००/- मंजूर निधी.

अबंधीत निधी हा पुढील बाबींवर खर्च करता येतो.

१. कार्यालयीन स्टेशनरी.
२. आरोग्य संस्थेचे विदयुत बिल भरणा करणे.
३. गरजू व गरीब रुग्णांना संदर्भ सेवा देणे.
४. रुग्णांना आरोग्य संस्थेत उपलब्ध नसलेल्या औषधे व तपासण्या उपलब्ध करणे .
५. गरोदर मातांना मोफत आहार देणे.

## ➢ ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती :-

१. ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीचा निधी प्रत्येक गावाला रु. १००००/- निधी दिला जातो . ग्राम आरोग्य पोषण पाणीपुरवठा व स्वच्छतासमिती निधी हा पुढील बाबीवर खर्च करता येतो.

१. गावातील सार्वजनिक पाणी व्यवस्थेवर टी. सी. एल. पावडर खरेदी करणे.

२. गावातील सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता ठेवणे .

३. गरीब रुग्णांसाठी संदर्भ सेवा देणे .

४. आरोग्य विषयक जनजागृती विषयक कार्यक्रमाचे आयोजन करणे.

५. कुटुंब कल्याण व पोषण आहार संबंधी कार्यक्रम राबवणे.

६. गावातील सार्वजनिक विहिरी, नाल्या तसेच सार्वजनिक स्वच्छलये स्वच्छताकरणे.

७. कुपोषित बालकांना आहार उपलब्ध करून देणे.

## ➢ प्रधानमंत्री मातृ वंदना योजना

प्रधानमंत्री मातृ वंदना योजना जिल्हा उस्मानाबाद येथे दिनांक 01.01.2017 रोजी पासून गरोदर माता व स्तनदा मातांना बुडीत मजुरी व सकस आहारासाठी केंद्र शासन मार्फत सुरु करण्यात अली असून सदर योजना सुरु झाल्या पासून ते अजतागायत 13732 लाभार्थ्यांना बँक/पोस्ट खात्या मध्ये डीबीटीच्या माध्यमातून तीन टप्प्यात 4,56,77,000/- जमा करण्यात अली असून सदर योजने अंतर्गत एकूण - ५०००/- लाभ देण्यात येतो लाभार्थी साठीच्या अति व हप्ता बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

१. दिनांक 01.01.2017 रोजी किंवा त्यानंतर गरोदर आहेत अशा सर्व गरोदर माता व स्तनदा मातांना कुटुंबातील पहिल्या अपत्यासाठी हा लाभ देता येईल.

२. गरोदर व स्तनदा माता या केंद्र अथवा अशा मातांना लाभ अनुज्ञेय नाही.

३. या योजना अंतर्गत पात्र लाभार्थींच्या एलएमपी (शेवटची मासिक पाली) दिनांक पासून ते पुढे दोन वर्षा (७३० दिवस) पर्यत नोंदणी करता येते.